नि.फौ.के.नं. ३९/२०१९

नि. क्र. ७६

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १० यांचा जबाब शपथेवर सुरु.</u>**

**नाव** – दत्तात्रय अनंत साळवी, **वय** – ५७ वर्षे, **व्यवसाय** – निवृत्त नोकरदार,

**राहणार** – साडवली, नेदरवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**<u>अभियोगपक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीम. ए. व्ही. गुरुपादगोळ यांचेतर्फे</u> –**

**०१**. सन २०१८ साली मी महाराष्ट्र राज्य परीवहन महामंडळ, देवरुख आगार येथे चालक म्हणून कार्यरत होतो. माझा स्वतःचा वाळू व्यवसाय होता. आम्ही आरोपीला वाळु सप्लाय केली होती. रोखीच्या व्यवहारावर आम्ही ती सप्लाय केली होती. त्यावेळी रक्कम रु. ४५००/– ब्रास या दराने वाळू दिली होती. साधारण सात लाखाची वाळू मी त्यांना पुरवली होती. मला आरोपीने चार ते पाच लाख रुपये व्यवहाराचे दिले होते. साधारण दिड लाखाची रक्कम येणे बाकी होती. त्यावेळी ती रक्कम येणे बाकी होती.

**०२**. त्यानंतर आरोपीने थोडे थोड करत माझे पैसे परतफेड केलेले आहेत. सन २०१९ मध्ये आरोपीने पैशांची परतफेड केलेली आहे. मी माझी रक्कम थकबाकी असल्याबाबत आरोपी विरुध्द काहीही कारवाई केली नव्हती. मी या घटनेसंदर्भात कोणाला काहीही माहीती दिली नव्हती. मी आरोपीला पाहील्यास ओळखु शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात दिसत नाही.

(**सरकारी वकीलांनी केलेल्या विनंतीनुसार पुराव्याचा का.क. १५४ अन्वये सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी दिली आणि फौ.प्र.सं.क. १६२(१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पध्दतीने साक्षीदाराची विधाने खंडन करण्याची अनुमती दिली.**)

**०३**. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी या घटनेविषयी माझ्याकडे चौकशी करुन माझे टिपण नोंदवले होते. साक्षीदाराला सरकारी वकीलांनी त्याच्या टिपणातील रेखांकीत मजकुर *त्यानंतर पासून वारंवार ----------- परंतु त्याने माझी दिड*

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.03.04 13:55:33 +0530

*लाख रुपयांची फसवणुक केली हे खरे आहे,* हा मजकुर वाचून दाखवला. हा मजकुर मी पोलीसांना सांगीतला होता की नाही मला आठवत नाही. साक्षीदार कथन करतो की, मला वाचून दखवलेला रेखांकीत मजकुर की, मी आरोपीच्या ऑफीसमध्ये जाऊन त्याच्याशी संपर्क साधून माझे वाळूचे उरलेले दीड लाख रुपये देण्याबाबत विनंती केली असता त्याने टाळाटाळ केली, माझे पैसे दिले नाहीत, माझी आर्थीक फसवणूक केली, मात्र माझ्याकडे वाळू पुरवल्या बाबत लेखी पुरावा नसल्याने मी त्याच्या विरुध्द कोर्टात केस केली नाही, मात्र त्याने माझी दीड लाख रुपयांची फसवणूक केली हा मजकुर खरा आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे वकील श्री. आर. के. शिंदे यांचेकडून शपथेवर सुरु</u> –**

**०४**. हे म्हणणे खरे आहे की, काल मला न्यायालयालयाचे समन्स प्राप्त झाल्यानंतर माझी या केसकामी साक्षीदार म्हणून नोंद आहे हे मला समजले. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी कधीही या गुन्ह्याच्या अनुषंगाने माझ्याकडे चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मला वाचून दाखवण्यात आलेला रेखांकीत मजकुर मी पोलीसांना टिपण देताना सांगीतला नव्हता.

**०५**. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या म्हणण्याप्रमाणे आरोपीने प्रामाणिकपणे माझे पैसे परत केले आहेत.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2025.03.04 13:55:38 +0530

**(श्रीमती एस.एच.पाटील)**

**दिनांक – ०४/०३/२०२५** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख.**